Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
Date 04 November 2024
Time 11.00 to 11.05 AM
Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: ०४ नोव्हेंबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस आहे. राज्यातल्या २८८ मतदारसंघांमध्ये सात हजार ६६ उमेदवारी अर्ज वैध ठरले आहेत. मात्र यापैकी किती उमेदवार माघार घेतात आणि किती उमेदवारी निवडणूक रिंगणात कायम राहतात, हे आज सायंकाळनंतरच स्पष्ट होईल.

राज्यात मराठवाड्यातल्या ४६ मतदारसंघांमध्ये सर्वाधिक उमेदवार आहेत, यामध्ये नांदेड जिल्ह्यातल्या भोकर विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक म्हणजे १४० उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. त्या खालोखाल बीड जिल्ह्यात माजलगाव मतदारसंघात ९८, तर बीड विधानसभा मतदार संघात ९० उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. राज्यात महाड विधानसभा मतदारसंघात सर्वात कमी म्हणजे फक्त पाच उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. मुंबईत चेंबूर, माहिम आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या सावंतवाडी मतदारसंघात प्रत्येकी सहा, तर शिवडी आणि कुडाळमध्ये प्रत्येकी सात उमेदवारांचे अर्ज पात्र ठरले आहेत.

****

माळी समाजाचे नेते किशोर कन्हेरे यांची आज काँग्रेसने प्रदेश उपाध्यक्ष म्हणून नेमणूक करण्यात आली. येणाऱ्या निवडणुकीत महाविकास आघाडीला पूर्ण पाठिंबा देणार असल्याचं कन्हेरे यांनी जाहीर केलं.

****

मराठा आंदोलन कर्ते मनोज जरांगे पाटील यांनी निवडणुकीतून माघार घेतली आहे. आपल्या सर्व उमेदवारांना त्यांनी अर्ज मागे घेण्याचं आवाहन केलं आहे. कोणताही उमेदवार उभा राहणार नसल्याचं ते म्हणाले. कालपासून झालेल्या बैठकीनंतर मनोज जरांगें पाटील यांनी आज सकाळी वार्ताहरांशी बोलताना हा निर्णय जाहीर केला.

****

नागपूर इथं आज केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते भाजपच्या तीन निवडणूक कार्यालयांचे उद्घाटन होणार आहे. यात दक्षिण नागपूर इथं मोहन मते यांच्या, पूर्व नागपूर इथं कृष्णा खोपडे यांच्या आणि मध्य नागपूर मतदारसंघातील प्रवीण दटके यांच्या कार्यालयांचा समावेश आहे. त्यानंतर उमेदवारांसाठी गडकरी यांच्या जाहीर सभा होणार आहेत.

****

महायुतीच्या प्रचाराला कालपासून प्रारंभ झाला. शिवसेनेचे मुख्य नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, मुंबईत कुर्ला इथं शिवसेना – महायुतीचे उमेदवार मंगेश कुडाळकर यांच्या निवडणूक प्रचारार्थ काल पहिली प्रचार सभा घेतली. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या प्रचारसभांनाही आजपासून प्रारंभ होत आहे. पहिली जाहीर सभा डोंबिवलीत तर दुसरी ठाण्यात होणार आहे.

****

शेतकऱ्यांचं हित लक्षात घेऊन केंद्र सरकारने कापसाच्या आयातीवर तत्काळ बंदी घालून भारतीय कापूस हमीभावाने खरेदी करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून केली आहे. कापूस उत्पादनात महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकाचं राज्य असून, ४० लाखांपेक्षा जास्त शेतकरी कापसाचं उत्पादन घेतात. राज्यात भरपूर कापूस उत्पादन होत असताना, २२ लाख गाठी कापसाची आयात करण्यात आल्याच्या बातम्यांमुळे देशात कापसाच्या भावात मोठी घसरण होण्याची भीती आहे. भारतीय कापूस महामंडळाकडेही विक्री न झालेल्या ११ लाख कापूस गाठी पडून आहेत ही बाब शासनानं लक्षात घ्यावी असं पटोले यांनी या पत्रात म्हटलं आहे.

****

जळगाव इथं रूशील मल्टिपर्पज फाऊंडेशन संचलित उडान दिव्यांग प्रशिक्षण केंद्रातील दिव्यांग विद्यार्थ्यांनी शहरातल्या चिमुकले श्रीराम मंदिरात १ हजार १५१ दिवे प्रज्वलित करून दीपोत्सव साजरा केला. अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते, उपविभागीय पोलीस अधिकारी संदीप गावीत, उडानच्या अध्यक्षा हर्षाली चौधरी, यांच्यासह इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

****

चेन्नईच्या महापौर राधाकृष्णन हॉकी स्टेडियमवर आजपासून १४व्या हॉकी इंडिया ज्येष्ठ पुरूष राष्ट्रीय स्पर्धेला सुरुवात होत आहे. १६ नोव्हेंबरपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत ३१ संघ आठ गटांमध्ये सहभागी होणार आहेत. सुरूवातीला उत्तर प्रदेशचा

सामना केरळ तर कर्नाटकचा सामना उत्तराखंडशी होणार आहे. हॉकी इंडियाचे अध्यक्ष दिलीप तिर्की यांनी ही माहिती दिली.

****

परभणी जिल्ह्यातल्या पालम तालुक्यात चाटोरी परिसरातील नागरिकांनी भारतीय सैन्यात कार्यरत असलेले सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांसहित `कृतज्ञता सोहळा` आयोजित करून दिवाळी साजरी केली. गावातील २५ सैनिकांचा यावेळी त्यांच्या कुटुंबीयांसह सन्मान करण्यात आला.

****

दिवाळी सुट्टीसाठी रेल्वेनं प्रवाशांच्या सुविधेसाठी 7435 विशेष रेल्वेगाड्या सुरु केल्या आहेत. राज्यात मुंबई, पुणे, नांदेड येथून प्रवाशांसाठी या विशेष रेल्वेगाड्यांची सुविधा उपलब्ध आहे. रेल्वेच्या या सुविधेबद्दल प्रवाशांनी आनंद व्यक्त केला आहे.

****

हवामान

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे . उद्यापासून सर्वत्र हवामान सूर्यप्रकाशयुक्त कोरडं राहील.

****